तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
३,महापालिका मार्ग,पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई -४०० ००१
E-mail:- desk11 dte@gmail. Internet: dtemahsrashtra.gov.in
दूरध्वनी : ०२२-३०२३३४७०/४११/४३१,२२६९०६०२,२२६४११५०/५१ , फॅक्स 22692102/22690007

ई-परिपत्रक

क्रमांक -११/तंशिसं/प्रशिक्षण/२०१७-१८/३०३
दि. १३/१०/२०१७

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /विना अनुदानित,
तंत्र निकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालये / ओषधनिर्माणशास्त्र
महाविद्यालये व तत्सम संस्था.

संचालनालय स्तरावरुन शिक्षकीय/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण वेळोवेळी आयोजित करण्यात येत असतात. अशा प्रशिक्षणाकरिता शिक्षकीय / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नांवे प्रस्तावित करण्याबाबत संचालनालयाकडून संस्थांना कळविले जात असते. प्रशिक्षणाकरिता प्रस्तावित करण्यात येत असलेल्या शिक्षकीय / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नांवाची ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. सर्व शिक्षकीय/शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नोंदणी करण्यापूर्वी प्राचार्यांची परवानगी घेतली आहे असे गृहीत धरुन संचालनालयातर्फे कार्यालयीन आदेश काढले जातात. परंतु काही प्रकरणामध्ये प्रार्चायांच्या पूर्वनुमतीशिवाय परस्पर ऑनलाईन नोंदणी केली जाते व संचालनालयाने कार्यालयीन आदेश काढल्यावरच प्राचार्यांना याची माहिती मिळते.

वरील परिस्थिती वारंवार उद्भवू नये व प्राचार्यांना शैक्षणिक कार्यक्रमांचे नियोजन करताना अडचण निर्माण होऊ नये या हेतूने आता सर्व संस्था प्रमुखांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, संस्थेतील सर्व अधिव्याख्याता/अधिकारी व कर्मचारी यांना उद्देशून एक परिपत्रक काढण्यास येऊन त्यांना सूचित करावे की, यापुढे ज्या अधिव्याख्याता/अधिकारी व कर्मचारी यांना, NITTTR किंवा इतर संस्थेमध्ये प्रशिक्षणासाठी जाण्याची इच्छा आहे. त्यांनी ऑन लाईन करण्यापूर्वी संस्था प्रमुखांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. अशा पूर्व परवानगीची नोंद संस्थेच्या प्रशिक्षण व आस्थापना विभागाकडे ठेवण्यात यावी व संबंधितांनी पूर्वपरवानगी न घेताच प्रशिक्षणासाठी नोंदणी केली असे निदर्शनास आल्यास त्यांच्या योग्य ती कार्यवाही करावी. तसेच NITTTR यांनी एखादया प्रशिक्षणासाठी निवड केली नसल्यास या संचालनालयाच्या स्तरावर प्रशिक्षणासाठी समावेश केला जाणार नाही यांची देखील संबंधितांना कल्पना दयावी आणि प्रशिक्षण संदर्भात नांव टाकण्याविषयी या कार्यालयास दूरध्वनी करु नये यांची नोंद घ्यावी.

( ए.ई.रायते, भा.प्र.से. )
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत- सर्व सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या विभागातील अधिनस्त संस्थांना कळवून सूचना द्याव्यात.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

जा.क्र.विकापु/आस्था-१/२०१७/ 4582

दि. 02 NOV 2017

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित,
तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तत्सम संस्था

माहिती व पुढील कार्यवाहीसाठी-

उपरोक्त मा.संचालक यांच्या सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करावे. आपल्या संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांना एनआयटीटीटीआर किंवा इतर संस्थेमध्ये प्रशिक्षणासाठी जाण्याची इच्छा असल्यास त्याकरीता ऑनलाईन अर्ज करणेपुर्वी संस्था प्रमुखांची लेखी परवानगी आवश्यक घेणे आवश्यक असल्याबाबत संस्थास्तरावर परिपत्रक निर्गमित करुन पुनःश्च एकदा सुचित करण्यात यावे. तसेच वरीष्ठ कार्यालयाचे परिपत्रकातील नमूद कार्यपद्धतीनुसार आवश्यक ती कार्यवाही संस्थास्तरावर करावी.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत - संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी